दैनिक रायगड नगरी
अन्यायाचा प्रतिकार | महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २८० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.४ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### नगरविकास मंत्र्यांनी घेतला सिडकोच्या विविध प्रकल्पांचा आढावा

# सिडकोने प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यावर भर द्यावा : ना.एकनाथ शिंदे

### नेरुळ व बेलापूर जेट्टीची केली पाहणी | खारघरच्या सेंटर ऑफ एक्सलन्स प्रकल्पास भेट

**दै.रायगड नगरी । ठाणे**

नगरविकास मंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सिडकोच्या विविध प्रकल्पांचा आढावा घेऊन नवी मुंबई मेट्रो, नेरुळ व बेलापूर जेट्टीसह इतर प्रकल्पांना भेटी दिल्या. सिडकोच्या वतीने सुरू असलेले प्रकल्पांचा दर्जा राखून ती वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

नगरविकास मंत्री श्री. शिंदे यांनी आज भाऊचा धक्का ते नेरूळ जेट्टी दरम्यान बोटीने प्रवास करून शिवडी – न्हावा शेवा सागरी सेतू प्रकल्पाची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी नेरूळ येथे नव्याने बांधण्यात आलेल्या जेट्टीची पाहणी केली. त्याच ठिकाणी त्यांनी सिडकोच्या विविध प्रकल्पांचा आढावा घेतला. यावेळी खासदार राजन विचारे, विजय नहाटा, नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर, नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे, एस. एस. पाटील, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्यासह सिडकोचे अधिकारी उपस्थित होते.

सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांनी सिडकोच्या वतीने सुरू असलेल्या प्रकल्पांचे सादरीकरण केले. प्रधानमंत्री आवास योजना तसेच सिडकोच्या आवास योजनेतील घरांचे बांधकाम, प्रस्तावित नावडे येथील टाऊनशिप, नवी मुंबई विमानतळ, नैना विकास आराखडा, नेरुळ जलवाहतूक टर्मिनल, नेरूळ –बेलापूर–खारघर सा–गरी मार्ग, पाणी पुरवठा योजना, सांडपाणी पुर्नप्रक्रिया, खारघर येथील सेंटर ऑफ एक्सलन्स, वाशी येथील ठाणे खाडीपूल, पालघरमधील प्रशासकीय इमारती



आदी प्रकल्पांचा यावेळी आढावा घेण्यात आला.

नगरविकास मंत्री श्री. शिंदे म्हणाले की, देशातील सर्वात उत्कृष्ट अशा इमारती सिडकोने पालघर मुख्यालयाच्या रुपाने उभारल्या आहेत. पालघरप्रमाणेच नवी मुंबईतील प्रकल्पांची कामे दर्जेदार तसेच वेळेत पूर्ण करण्यावर भर द्यावा. सिडकोच्या वतीने उभारण्यात आलेल्या व पुढील काळात उभारण्यात येणाऱ्या रेल्वे स्थानकांवर सरकत्या जिन्याची सोय करण्यात यावी. सिडकोच्या विविध प्रकल्पांमुळे येत्या काही वर्षात नवी मुंबईचा चेहरामोहरा बदलणार आहे. या प्रकल्पांमुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळणार आहे.

### नवी मुंबई मेट्रोतून पालकमंत्र्यांचा प्रवास

नेरुळ येथील जेट्टीच्या पाहणीनंतर पालकमंत्री श्री. शिंदे व खासदार राजन विचारे यांनी बेलापूर येथील जेट्टीला भेट दिली. त्यानंतर त्यांनी खारघरमधील सेंट्रल पार्क मेट्रो स्थानक येथे भेट देऊन मेट्रोची पाहणी केली. तसेच सेंट्रल पार्क मेट्रो स्थानक ते पेंधर मेट्रोस्थानक असा प्रवासही त्यांनी मेट्रोमधून केला. या प्रवासादरम्यान त्यांनी मेट्रोच्या कामाची माहिती घेतली. नवी मुंबई मेट्रोच्या या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण करून हा मार्ग लवकरात लवकर सुरूवात करावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी संबंधितांना केली. पालकमंत्री श्री. शिंदे यांनी खारघर येथे सुरू असलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्स सेंटरच्या प्रकल्पास भेट दिली. या प्रकल्पामुळे नवी मुंबई च्या क्रीडा संस्कृतीला चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## मुंबईसह नवी मुंबईत पहिली ते नववीचे ऑफलाईन वर्ग बंद राहणार

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**



नवी मुंबईतील शाळाही ३१ जानेवारीपर्यंत बंद राहणार आहेत. मुंबई पाठोपाठ नवी मुंबई पालिकेनंही वाढत्या कोरोना रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला आहे. शाळांचे ऑफलाईन वर्ग बंद करण्यात येत असून शाळा पुन्हा ऑनलाईन सुरु राहणार आहेत. दरम्यान, दहावी बारावीचे वर्ग ऑफलाईन सुरु राहणार असल्याचंही सांगण्यात आलंय. सगळ्यात मुंबई महानगरपालिकेनं शाळांबाबत निर्णय जाहीर केला होता. त्यानंतर ठाण्यातही शाळांबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर आता लगेचच नवी मुंबईतही शाळांचे ऑफलाईन वर्ग बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्रात आज पुन्हा एकदा विक्रमी रुग्णवाढ झाली आहे. महाराष्ट्रातील आजची रुग्णवाढ ही १२ हजारपेक्षा जास्त असल्यानं पुन्हा एकदा चिंता वाढली आहे. तर ११ रुग्ण आज दिवसभरात दगावले आहे. दरम्यान, ओमिक्रॉनचे ९ रुग्ण नवी मुंबईत आज आढळून आले आहेत. तर ५१२ नव्या कोरोना रुग्णांचीही नवी मुंबईत भर पडली आहे. दररोजच्या रुग्णवाढीनं प्रशासनासह नागरीकही धास्तावले असून वेळीच खबरदारी बाळगण्याची गरज पुन्हा एकदा व्यक्त केली जाते आहे.

दरम्यान, सलग दुसऱ्या दिवशी मुंबई ८ हजारपेक्षा जास्त रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे मुंबईतील सक्रिय रुग्णांची संख्याही वाढली आहे. मुंबईतील चाचण्यांची क्षमताही वाढवण्यात आली आहे. दरम्यान, महत्त्वाची गोष्ट म्हणजे आज सगळ्यात आधी मुंबई पालिकेनं शाळांबाबत निर्णय घेत दहावी आणि बारावी सोडून इतर वर्ग हे ऑनलाईन सुरु ठेवण्यासंबंधी निर्देश दिले आहेत. तर ऑफलाईन वर्ग हे फक्त दहावी आणि बारावीचेच सुरु राहणार असल्याचंही स्पष्ट केलं आहे. आजपासून राज्यातील किशोरवयीन मुलांच्या लसीकरणालाही सुरुवात करण्यात आली होती. वाढत्या रुग्णवाढीमुळे लहान मुलांमध्ये संसर्ग वाढू नये, यासाठी आता सर्वच पालिकांनी खबरदारी म्हणून ऑफलाईन वर्ग बंद ठेवण्याचे निर्देश जारी केले आहेत.

## महापौर सहाय्यता निधीतून दोन लाभार्थ्यांना मदत मंजूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका हद्दीतील रहिवाशी असणाऱ्यांना वैद्यकीय कारणासाठी महापौर निधीतून मदत देण्यात येते. सोमवारी झालेल्या महापौर सहाय्यता निधि समितीच्या बैठकीत दोन लाभार्थ्यांना मदत मंजूर करण्यात आल्याची माहिती महापौर डॉक्टर कविता चौतमोल यांनी दिली.

पनवेल महापालिकेच्या महापौर सहाय्यता निधी समितीची बैठक सोमवार (दि. ३) महापौर डॉ कविता चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी स्थायी समितीचे अध्यक्ष संतोष शेट्टी, माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, प्रभाग समिती सभापती सुशीला घरत, अनीता पाटील, हेमलता म्हात्रे, उपायुक्त सचिन पवार, मुख्य लेखाधिकारी गावडे उपस्थित होते

महापौर सहाय्यता निधीतून मदत मिळण्यासाठी दोन अर्ज आले होते. खारघर येथील रहिवाशी शंकर नामदेव वाघमारे यांना कॅन्सर संबंधित केमोथेरपीसाथी ४ लाख खर्च येणार आहे. त्यांना नगरसेवक प्रवीण पाटील यांनी मदत देण्याची शिफारस केली होती. त्यांना २५ हजार रुपये मंजूर करण्यात आले. घोटगाव येथील रहिवाशी अश्विनी किशोर निघूकर या अपघातग्रस्त तरुणीच्या मेंदूवर शस्त्रक्रिया किरण्यासाठी २ लाख ५२ हजार रुपये खर्च येणार आहे. तिला १५ हजार रुपये मदत मंजूर करण्यात आले.



## संक्षिप्त...

### मुंबई जिल्हा बँकेत प्रवीण दरेकरांचे वर्चस्व

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीतही भाजपने घवघवीत यश मिळवले आहे. मुंबै बँक निवडणुकीत भाजप आमदार प्रवीण दरेकर यांच्या पॅनेलचे एकहाती वर्चस्व राहिले. प्रवीण दरेकर यांच्या सहकार पॅनेल सर्व २१ जागांवर विजयी झाले आहेत. यातील १७ जागा याआधीच बिनविरोध झाल्या होत्या. तर चार जागांसाठी निवडणूक झाली होती. या चार जागांची मतमोजणी आज पार पडली.

आज झालेल्या मतमोजणीत प्रवीण दरेकर यांच्या सहकार पॅनेलचे चारही उमेदवार विजयी झाले. मध्यवर्ती ग्राहक (होलसेल कंझ्यूमर्स) मतदार संघातून विठ्ठल भोसले यांनी सुखदेव चौगुले यांचा पराभव केला.

विठ्ठल भोसले यांना १८ मतं तर सुखदेव चौगुले यांना १६ मतं मिळाली. प्राथमिक ग्राहक मतदार संघात पुरुषोत्तम दळवी यांनी कमलाकर नाईक यांचा मोठ्या फरकाने पराभव केला.

पुरुषोत्तम दळवी यांना १३१ मतं तर कमलाकर नाईक यांना ५९ मतं मिळाली. तर, महिला सहकारी संस्था मतदार संघ जयश्री पांचाळ यांना ३३२ मतं तर, शालिनी गायकवाड यांना १८८ मतं मिळाली आहेत.

याशिवाय, भटक्या जाती, विमुक्त जमाती व विशेष मागासवर्गीय मतदार संघातून अनिल गजरे यांना तब्बल ४ हजार मते मिळाली तर, यलाप्पा कुशाळकर यांना अवघी ३५० मते मिळाली.



**रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय (स्वायत्त) येथे नव्याने कार्यान्वित करण्यात आलेल्या स्कॅनिंग इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप तसेच स्किल ट्रेनिंग लॅबोरिटीचे उदघाटन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे सचिव विठ्ठल शिवणकर, प्रशांत पाटील, ॲड. पी. सी. पाटील, प्राचार्य शुभदा नायक, डी. जी. बोटे, सी. दि. भोसले, बाळासाहेब लेंगरे आदी उपस्थित होते.**

## कर्जत शहरात दुकानात घुसून ४० हजारांची चोरी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

धाकटे वेणगाव येथील रहिवाशी आणि कर्जत बाजारपेठ मधील भाजी मार्केट मधील महालक्ष्मी दूध डेअरी आणि कोल्ड्रिंक्सच्या दुकानात घुसून दोन चोरट्यांनी ४० हजाराची रोकड लंपास केली. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील कर्जत शहरात भाजी मार्केट मध्ये धाकटे वेण–गाव येथे राहणाऱ्या स्थानिकांचे कर्जत बाजारपेठेतील भाजी मार्केट मध्ये महालक्ष्मी दुध डेअरी अँड कोल्ड्रींक्स .../२

## पोलीसाचा विवाहीत महिलेवर बलात्कार

### श्याम जाधव पोलीसाने केली पोलीस ठाण्यात पोलिसांनाच मारहाण

**दै.रायगड नगरी । पेण**

पोलीस असल्याचा गैरफायदा घेत पती व मुलांना जीवे ठार मारण्याची धमकी देऊन विवाहीत महिलेशी तिच्या संमती शिवाय मागील सहा वर्षांपासून शारीरिक संबंध ठेवणाऱ्या पोलीस कॉन्स्टेबल शाम जाधव याच्या विरोधात पेण पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पेण पोलिसांनी आरोपी शाम जाधव याला अटक केली असून त्यास न्यायालयात हजर केले असता त्याला चार जानेवारी आज पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

अलिबाग येथील मुख्यालयात कार्यरत असलेला पोलीस कॉन्स्टेबल शाम जाधव (रा.शिवाजी नगर ,रामवाडी ,पेण) याने पोलीस असल्याचा फायदा घेत पेण शहरातील एका विवाहित महिलेला तिच्या पतीला व मुलांना जीवे मारण्याची धमकी देऊन २०१५ पासून आज पर्यंत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले





असल्याची तक्रार या महिलेने पेण पोलीस ठाण्यात शुक्रवारी रात्री दाखल केली आहे. त्यानुसार पेण पोलीस ठाण्यात आरोपी पोलीस शाम जाधव याच्या विरोधात गुन्हा रजिस्टर नं. ०१/ २०२२ भा.द.वि. कलम ३७६ (१ ), ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी शाम जाधव याला पेण पोलिसांनी अटक केली असून त्यास न्यायालयात हजर केले असता त्यास चार जानेवारी पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

आरोपी शाम जाधव याच्या विरोधात सदर महिला पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी गेली असता या महिलेची फिर्याद एकूण घेत असताना आरोपी शाम जाधव याने पेण पोलीस ठाण्यात जाऊन गोंधळ घातला. ड्युटीवर असलेल्या महिला पोलीस नाईक व महिला पोलीस उप निरीक्षक घाडगे यांना शिवीगाळ केली. यावेळी ड्युटीवर .../२

### माथेरानमध्येही केली होती पत्रकारासोबत दादागिरी

श्याम जाधव पाच महिन्यांपूर्वी माथेरान पोलीस स्टेशन येथे कार्यरत असताना रात्रीच्या वेळेत टपरी बंद झाल्यानंतर पान दिले नाही म्हणून टपरी मालकाला शिवीगाळ करत मारहाण केली होती. यावेळी सदर वाद सोडविण्यासाठी पत्रकार गेले असता त्यांच्या बरोबरही दादागिरी केली होती.

## महापालिका क्षेत्रात १५ ते १८ वयोगटातील लसीकरणास सुरूवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या वाढत्या रूग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर १५ ते १८ वयोगटातील मुलां–मुलींचे कोरोना प्रतिबंधक लसीकरणास आज पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सुरूवात झाली. या कार्यक्रमाचे उद्घाटन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने के. वी कन्याप्रशाला, पनवेल येथे करण्यात आले. याच बरोबर पालिका क्षेत्रातील चारही प्रभागातील विविध दहा शाळांमध्येही लसीकरणास सुरूवात झाली. पहिल्या दिवशी दहा शाळांमध्ये जवळपास ५ हजार विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले.

यावेळी महापौर डॉ.कविता किशोर चौतमोल, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी तसेच आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त सचिन पवार, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, शिक्षण विभागाचे प्रशासकिय अधिकारी बाबासाहेब



चिमणे, वैद्यकिय अधिकारी रेहाना मुजावर तसेच शाळेचे पदाधिकारी,शिक्षक ,परिचारिका, विद्यार्थी उपस्थित होते.

हे लसीकरण करण्यास पनवेल महापालिक सज्ज झाली असून शिक्षण विभागाच्या मदतीने २३० शाळांमध्ये जाऊन लसीकरण करण्यात येत आहे. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १,२,३,४,५,६ अंतर्गत प्रत्येक शाळांचे दिनांक आणि वार निहाय वेळापत्रक करण्यात आले आहे. या वेळापत्रकानूसार त्या त्या शाळांमध्ये लसीकरण होणार आहे. दररोज १० शाळांमध्ये लसीकरणासाठी १० पथके .../२

## अखेर एनसीबी अधिकारी समीर वानखेडेंची बदली

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एनसीबीचे झोनल डायरेक्टर समीर वानखेडे यांना एनसीबीमध्ये आणखी मुदतवाढ मिळालेली नाही. त्यांची सध्याची मुदत ३१ डिसेंबर रोजी संपली आहे. समीर वानखेडे हे आयआरएस अधिकारी असून ते मुंबईतील ड्रग्ज प्रकरणाच्या तपासामुळे प्रसिद्धीच्या झोतात आले होते. त्यानंतर आर्यन खानच्या अटकेपासून ते सतत चर्चेत राहिले. आता त्यांची पुन्हा डीआरआयमध्ये बदली करण्यात आली आहे. समीर वानखेडेंची ऑगस्ट २०२० मध्ये नियुक्ती



करण्यात आली होती. IRS अधिकारी समीर वानखेडे यांची NCB मध्ये ४ महिन्यांची मुद–तवाढ ३१ डिसेंबर २०२१ रोजी पूर्ण झाली आहे. एनसीआरबीमध्ये त्यांच्या पोस्टिंगबद्दल अनेक दिवसांपासून त्यांना पुन्हा मुदत वाढ मिळवण्यासाठी प्रयत्न केले जात होते. पण असे झाले नाही.

# तब्बल २३० फूट उंच व अवघड तैलबैला सुळक्याच्या चारही बाजूंवर मॅकविलाच्या टीमची थरारक चढाई

## चार जणांच्या टीमध्ये एका महिला गिर्यारोहकाचा समावेश

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील धोंडेस गावापासून काही अंतरावर व सुधागड किल्ल्याच्या समोर आणि मुळशी तालुक्यात २३० फूट उंचीचा तैलबैला हा सुळका आहे. वर्षांअखेर या अवघड सुळक्याच्या चारही बाजूंवर मॅकविला द जंगल यार्ड च्या टीम ने दोन दिवस थरारक यशस्वी चढाई केली आहे. यामध्ये एका महिला गिर्यारोहकाचा समावेश होता. या साहसी चढाई नंतर सर्वच टीमवर कौतुकाचा वर्षाव होतोय.

सुधागड तालुक्यातील पोटलज खुर्द गावचे सुपूत्र व मॅकविला द जंगल यार्ड चे संस्थापक मॅकमोहन हुले यांनी रविवारी (ता.२) सांगितले की या सुळक्याचा ९० अंशांतील कातळकडा आणि अंतिम टप्प्यातील अवघड चढाईमुळे गिर्यारोहकांचा पूर्णपणे कस लागला. तैलबैला हा किल्लेवजा सुळका असून तो प्रस्तरारोनासाठी अतिशय कठीण श्रेणीमध्ये ओळखला जातो. या नैसर्गिक भिंतीवर चारही बाजूंनी आरोहण करता येते. अनुभवी प्रस्तरारोहक मॅकमोहन यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम फत्ते करण्यात आली. अनुभवी गिर्यारोहक आपल्या तंत्रशुद्ध अभ्यासासहित तेलबैला सरावासाठी मोहिमा आखतात असे देखील मॅकमोहन यांनी सांगितले. या मोहिमेत मॅकमोहन हुले, सागर मेस्त्री, आयुष सिंग व शोभा मोहपात्रा हे प्रस्तरारोहक सहभागी झाले होते.

मॅकमोहन हुले यांनी सांगितले की तैलबैलाची उजवीकडील बाजू सर्वात कठीण आणि चौथ्या श्रेणीत गणली जाते. सर्वप्रथम सागर मेस्त्री या अनुभवी गिर्यारोहकाने प्रस्तरारोहण चढाईला सुरुवात केली. ते ८० फुटावरील पहिल्या स्टेशनला पोहोचले. त्यांना सुरक्षा दोर आयुष सिंग यांनी दिले. सागर यांच्यापाठोपाठ आयुष सिंग हे सुद्धा पहिला स्टेशनला पोचले. मॅकमोहन हे सर्व दोर सोडवत पहिल्या स्टेशनवर पोहोचले. आयुष सिंग यांना पुढचा टप्पा अवघड जाणार म्हणून त्यांनी रॅपलडाऊन केले. पुढील चढाई मॅकमोहन यांनी लीड केली व दुसरे स्टेशन तसेच तिसरे स्टेशन करत अंतिम टप्प्यात पोहोचले. मागोमाग सागर मेस्त्री यांनी झूमररिंग करत अंतिम टप्प्यात माथा गाठला.

तेलबैलाच्या मध्यस्थानी मंदिराकडील डाव्या बाजूची प्रस्तरारोहण चढाई ही प्रथम श्रेणीतील आहे. गिर्यारोहक आयुष सिंग यांनी लीड क्लायम्बिंग करून पहिले स्टेशन गाठले, त्यांना सुरक्षा दोर मॅकमोहन यांनी दिले. शोभा यांनी त्यांच्या मागोमाग चढाई केली. अशाप्रकारे दुसरे स्टेशन तसेच तिसरे स्टेशन करत अंतिम टप्प्यात माथा गाठला.

सुधागड किल्ल्याकडे बाजू अवघड असून, ही तिसऱ्या श्रेणीत गणली जाते. सर्वप्रथम चढाई करण्यासाठी मॅकमोहन यानी तयारी केली. त्यांना सागर मेस्त्री यांनी सुरक्षा दोर दिला. प्रथम ५० फुटांचा कातळकडा चढून मॅकमोहन प्रस्तराच्या कंगोऱ्यावर पोहचले. त्यापाठोपाठ झुमरिंग करत सागर मेस्त्री तेथे दाखल झाले. पुढील ९० अंशातील कातळकडा चढताना मॅकमोहन यांचा कस लागला. तिरक्या रेषेत चढाई करत त्यानी ८० फुटांवर दुसरा टप्पा घेतला. त्यानंतर पुढील ३० फूट आणि ५० फुटांवर मॅकमोहन पोचला. ५० फुटांची अंतिम चढाई पूर्णपणे दगड, मातीमिश्रित ठिसूळ संरचनेची (स्क्री) आहे. त्यामुळे या मार्गात अत्यंत सावध राहत आणि दगड ढासळणार नाहीत याची काळजी घेत मॅकमोहन सुळक्याच्या माथ्यावर पोचले. त्याच्यापाठोपाठ सागर मेस्त्री हे गिर्यारोहक माथ्यावर दाखल झाले.




### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : जांबरुंग, ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरांत नमूद असलेल्या जमीन मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : जांबरुंग, ता.खालापूर, जि.रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकारा रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्री.पुंडलिक पांडु तांडेल<br>२) सौ.बेबी बाळु रुठे<br>३) सौ.कविता कैलास थवई<br>४) सौ.अलका अरुण तांडेल<br>५) श्री.नितीन बाळु तांडेल<br>६) सौ.गंगाबाई बाळु तांडेल<br>७) श्री.मनोहर बाळु तांडेल<br>८) सौ.शैला गणेश भुंडेरे<br>९) श्री.प्रकाश झिपरु तांडेल<br>१०) सौ.वनिता उर्फ ललिता वासुदेव पाटील<br>११) सौ.हिरा गणेश भगत<br>१२) श्री.कैलास तुळशीराम धुळे<br>१३) श्री.अमोल मनोहर लोभी<br>१४) सौ.अंकिता मनोहर लोभी<br>१५) सौ.अंजना विनोद मोरे<br>१६) श्री.अक्षय अशोक पिंगळे<br>१७) सौ.अंकिता अशोक पिंगळे<br>१८) सौ.अस्मिता अशोक पिंगळे | १४८ | ० | ०.२४.५०<br>पो.ख.०.०१.८०<br>एकूण क्षेत्र<br>०.२६.३०<br>एवढ्या<br>क्षेत्राबाबत | ०४.६२ |

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारांस कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लिज, लीएन, सदर मिळकतीतून जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचे पत्यावर लेखी नोंदवावी.

वरील विहित मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न प्राप्त झाल्यास नोटीसीत नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे व मिळकतीचे मालकांचे मालकी व वहिवाटी हक्कासंबंधात कोणताही वाद नाही असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त होणारी हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

दि.०३/०१/२०२२

**सही/-**
**ॲड.सागर काशिनाथ कोंडीलकर**
**ऑफिस : शॉप नं.२१, पहिला मजला**
**महानगरपालिका कॉम्प्लेक्स,**
**पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८७९६८७७३६९**



मा.गोडसे मॅडम

ॲड.प्रमिला ठाकूर / पाटील

### जाहीर समन्स

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश सो. यांच्या कोर्टा समोर

सि.एम.ऐ.नं.१९४५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१७/२/२०२२

राजेश शामसुंदर कोरगांवकर वगैरे १
शीतल विनायक गुजर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ व २ चे वडील कै.शामसुंदर दत्ताराम कोरगांवकर हे दि.१/३/२०२१ रोजी मयत झाले असून आई कै.जयमाला शामसुंदर कोरगांवकर या दि.२५/८/२००९ रोजी मयत झाले आहेत. त्यांचा दाखला अर्जासोबत जोडला आहे.

कै.शामसुंदर दत्ताराम कोरगांवकर यांच्या मृत्यूनंतर यांच्या नावांने खालील मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट नं.१०३, पहिला मजला, ऐ विंग, महाविर टॉवर, प्लॉट नं.९१, मौजे : उलवे, बामणडोंगरी, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकती**

**२) मौजे : बोरभाटी, ता.कुडाळ, स.नं./गट नं.५/९, सिंधुदूर्ग**

सदरील वारस दाखला मधील मिळकती संदर्भात अन्य कोणाच्या नावाने मृत्यूपत्रानं, खरेदीखताने, हक्कसोडपत्राने, बक्षिसपत्राने, गहाण अथवा इतर कोणत्रूाही वारसांची कसलीही हरकत असल्यास सदरील जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत मे.पनवेल कोर्टात हरकत नोंदवावी.

वरील मुदतीमध्ये ३० दिवसांत हरकत आली नाही तर सदरील मिळकतींना अर्जदार राजेश शामसुंदर कोरगांवकर व शीतल विनायक गुजर हे कै.शामसुंदर दत्ताराम कोरगांवकर, आाई कै.जयमाला शामसुंदर कोरगांवकर यांच्या निधनानंतर कायदेशीर वारस आहेत असे वारस दाखला त्यांना देण्यात येईल. तसेच मागावून येणाऱ्या हरकतींचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दि.०३/०१/२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## कर्जत शहरात दुकानात घुसून ४० हजारांची चोरी

हे दुकान आहे. एक जानेवारी रोजी रात्री साडेआठच्या सुमारास उल्हासनगर आणि कर्जत बुद्धनगर येथे राहणाऱ्या दोघांनी दुकानात घुसुन फ्रिज ढकलून देत त्या दुकानाच्या गल्ल्यातील सुमारे ४० हजारांची रोकड लंपास केली.

जबरी चोरी करणाऱ्या चोरट्यांना अडविण्याचा प्रयत्न केला असता त्या चोरट्यांनी दुकान मालक यांना तेथिल कोल्ड्रिंक बाटल्यांनी मारहाण करून त्यांना दुखापत केली. त्यामुळे ते दोघे तेथून पसार झाले. कर्जत पोलीस ठाण्यात टाकणार दाखल झाल्यानंतर पोलीस निरि्सखक सुवर्णा पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गु.र.नं. ०२/२०२२ भा.दं.वि.क. ३९४,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे हे करीत आहेत.

## पोलीसाचा विवाहीत महिलेवर बलात्कार

असलेले पोलीस नाईक गुजराथी व पोलीस शिपाई मढवी हे समजावण्यासाठी गेले असता त्यांना देखील शिवीगाळ करुन हाताबुक्क्याने मारहाण केली. तसेच शाम जाधव याला तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात नेण्यासाठी आलेले पोलीस शिपाई जाधव याना शिवीगाळ करुन लाथेने मारहाण केली व गुजराथी यांच्या कानाखाली मारली. या याप्रकरणी देखील आरोपी शाम जाधव याच्या विरोधात पेण पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी भा.द.वि. कलम ३५३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस निरिक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## महापालिका क्षेत्रात १५ ते १८ वयोगटातील लसीकरणास सुरूवात

तयार करण्यात आली आहेत. प्रत्येक पथकात एक डॉक्टर, परिचारिका, रूग्णवाहिका असणार आहेत. सर्व शाळांचे येत्या आठ -दहा दिवसात हे लसीकरण पुर्ण करण्याच्या दृष्टीने महापालिकेने नियोजन केले आहे.

महापालिकेच्यावतीने १५-१८ वयोगटातील रोज होणारे लसीकरणाचे सेशन ऑनलाईन पद्धतीने प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्याचबरोबर महापालिकेच्यावतीने समाजमाध्यमावर प्रसिद्ध होणाऱ्या प्रेस नोट मध्येही रोजच्या लसीकरणाची माहिती देण्यात येणार आहे.

पनवेल महापालिका हद्दीत सुमारे ४० हजार मुले आहेत. त्यांच्या पालकांनी प्रसिध्द केलेल्या आठवड्याच्या नियोजनातील शाळेतील विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी करावी. जास्तीत जास्त पालकांनी आपल्या मुलांच्या आरोग्यासाठी मुलांना लस देण्यासाठी शाळेला परवानगी द्यावी आणि ऑनलाईन नोंदणी करावी असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# नवीन विद्युत पोल उभारणी कामाला सुरुवात; नागरिकांमध्ये समाधान

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली शहरातील सुभाष नगर या भागात मोठ्या प्रमाणत लोकवस्ती असून या ठिकाणी नागरी सुविधा व्हाव्यात यासाठी येथील ग्रामस्थ राहुल जाधव यांनी नगरपालिकेकडे पाठपुरावा केला होता, त्यामध्ये निवेदन देऊन मागणी केलेल्या सुविधेमध्ये यापूर्वी रस्त्याची समस्या काही प्रमाणात सुटली असून नुकताच या भागातून प्रवास करताना उजेड नसल्याने अडचणी निर्माण होत असल्याने पालिकेच्या माध्यमातून या भागात रस्त्याच्या बाजूला स्ट्रीट लाईट खांब बसविण्याचे काम सुरू झाल्याने येथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

सुभाष नगर भाग हा मोठ्या लोकवस्तीचा असून या भागात ५० वर्षांपासून वस्ती आहे. या भागात मोठमोठे कारखाने असल्याने पालिकेला नागरी सुविधा देताना अडचणी भासत होत्या. मात्र येथील ग्रामस्थ राहुल जाधव व गावकऱ्यांनी खोपोली नगरपालिकेकडे नागरी सुविधांचा अभाव असल्याचे निवेदन दिले होते.

त्यामध्ये रस्ता, लाईटसह अन्य मागण्या केल्या होत्या. त्यानुसार रस्त्या बनविताना काही तांत्रिक अडचणी सोडवून रस्त्याचे काही प्रमाणात काम झाले असून रस्त्याच्या बाजूने लाईट नसल्याने रात्रीच्या दरम्यान विशेषता महिला वर्गाला येथून प्रवास करताना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत होते. ग्रामस्थांच्या पाठपुराव्याने स्ट्रीट लाईट बसविण्याचे काम सुरू झाल्याने येथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. या कामासाठी नगरपालिका व महिंद्रा कंपनीचे राहुल जाधव यांनी आभार मानले आहेत.

सुभाषनगर भागात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे, या ठिकाणी अनेक वर्षांपासून नागरी सुविधा व्हाव्यात म्हणून नागरिकांबरोबर घेऊन नगरपालिकेला मागण्यांचे निवेदन देऊन अडीच वर्षे पाठपुरावा करीत होतो. त्यामुळे पालिकेच्या माध्यमातून येथील सुविधा देण्याचे काम काही प्रमाणात प्रगतीपथावर आहे, त्यामुळे भविष्यात येथील नागरिकांना व महिलांना अडचणीतून मुक्ती मिळेल.



# ८ लाख रुपये उकळणाऱ्या सायबर चोरट्यांचा पोलिसांकडून शोध सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ओएलएक्सवर घरातील जुने कपाट विकण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका व्यक्तीला सायबर चोरटयांनी तब्बल ८ लाख रुपयांना गंडा घालून त्याची फसवणुक केल्याची घटना नेरुळमध्ये उघडकीस आली आहे. नेरुळ पोलिसांनी या सायबर चोरटयांविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणात फसवणुक झालेल्या व्यक्तीचे नाव आनंद राम कृष्णन (४४) असे असून तो नेरुळ सेक्टर-१९ भागात कुटुंबासह राहण्यास आहे. गत सफ्टेंबर महिन्यामध्ये आनंदने आपल्या घरातील जुने कपाट विकण्यासाठी ओएलएक्सवर जाहिरात टाकली होती. त्यावेळी एका सायबर चोरटयांने आर्मी मध्ये नोकरीला असल्याचे भासवून आनंदचे कपाट ७ हजार रुपयांमध्ये विकत घेण्याची तयारी दर्शविली होती. त्यावेळी आनंदने त्याला कपाट पहाण्यासाठी नेरुळ येथे येण्यास सांगितले असता, सायबर चोरटयांने आर्मीमध्ये डयुटीवर असल्याचे कारण सांगत, त्याच्या ऐवजी दुसरा व्यक्ती कपाट घेण्यासाठी येणार असल्याचे सांगितले. तसेच कपाटाची किंमत ऑनलाईन पेटीएमद्वारे पाठवित असल्याचे सांगून त्याच्या मोबाईलवर क्युआर कोड स्कॅन करण्यासाठी पाठवून दिला.

आनंदने क्युआर कोड स्कॅन केल्यानंतर त्याच्या खात्यातून दुर्गेश्वरी मिश्र या व्यक्तीच्या खात्यात ९६ हजार रुपये वळते झाले. ही बाब आनंदने सायबर चोरटयांला सांगितल्यानंतर त्याने आनंदला टेक्नीशीयनचा नंबर देऊन त्याची रक्कम तो परत पाठवेल असे सांगितले.

त्यानुसार आनंदने दुसऱ्या सायबर चोरटयांला संपर्क साधल्यानंतर त्याने आनंदला त्याच्या ऑनलाईन खात्यात बेनिफीशरी म्हणून त्याचे नाव टाकल्यास भाग पाडले. त्यानंतर त्याच्या खात्यातून अभिषेक पाठक, रोहीत अनुराग, अनुराग कुमार यांच्या खात्यात १ लाख ९९ हजार रुपये गेले.

तसेच ज्योती सक्सेना, समीर सक्सेना या दोघांच्या खात्यावर तब्बल ५ लाख ९ हजार रुपये वळते झाले. त्यानंतर आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्यानंतर आनंदने आपले दोन्ही खाते बंद केले. त्यानंतर त्याने नेरुळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.


## ग्रुप ग्रामपंचायत चिखले

### ता.पनवेल, जि.रायगड सन-२०२१/२०२२

ग्रुप ग्रामपंचायत चिखले, ता.पनवेल, जि.रायगड हे ग्रुप ग्रामपंचायत चिखले हद्दीतील पुढील विकासकामे करणेकरिता सिलबंद निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | इसारा रक्कम १% | सुरक्षा अनामत ५% | ठेकेदाराचा वर्ग | निविदा किंमत | निविदा पाठविणेची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन गाव सांगडे (ग्रामनिधी) | २,५९,८७०.०० | २५९८.०० | १२९९४.०० | - | १००.०० | १२/०१/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत |
| २ | सांडपाणी व घनचकरा व्यवस्थापन गाव चिखले (सांडपाणी) | ७९,०३४.०० | ७९०.०० | ६९५२.०० | - | १००.०० | |
| ३ | विजया सदन सोसायटी चिखले येथील रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे (ग्रामनिधी) | २,४९,१७३.०० | २४९२.०० | १२४५९.०० | - | १००.०० | |
| ४ | मारुती मंदिर सांगडे पटांगण येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. (१५ वा वित्त आयोग ग्रा.पं.स्तर) | २,१०,३२७.०० | २१०३.०० | १०५१६.०० | - | १००.०० | |
| ५ | चिखले ट्रान्सफार्मर ते हनुमान मंदिर पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे (१५ वा वित्त आयोग ग्रा.पं.स्तर) | २,२०,०००.०० | २२००.०० | ११०००.०० | - | १००.०० | |

१) अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दि.०४/०१/२०२२ ते ११/०१/२०२२ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.
२) भरलेल्या सिलबंद निविदा दि.१२/०१/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी ०२:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
३) आलेल्या निविदा दि.१२/०१/२०२२ रोजी दुपारी ०४:०० वाजता समक्ष उघडण्यात येतील.
४) इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट ग्रुप ग्रामपंचायत चिखले यांचे नावे असावा, अथवा रोखीने.
५) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
६) निविदा किंमत ना परतावा राहील.
७) नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल.
८) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
९) कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.
१०) झालेल्या तांत्रिक मुल्यांकना प्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
११) मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व पंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१२) निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.
१३) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१४) काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.
१५) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.
१६) एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-** **सुपर्णा सुर्यकांत अडुळकर** **ग्रामसेवक** **ग्रुप ग्रामपंचायत चिखले** **ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-** **नामदेव माया पाटील** **सरपंच** **ग्रुप ग्रामपंचायत चिखले** **ता.पनवेल, जि.रायगड**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## गॅस गोडावूनमध्ये चोरी करणाऱ्या दोघांना तळोजा पोलिसांनी घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गॅस गोडावूनमध्ये चोरी करण्याच्या उद्देशाने आत प्रवेश केलेल्या दोघा जणांना तळोजा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील ओनस एचपी गॅस एजन्सीमध्ये घरफोडी करण्याच्या उद्देशाने लोखंडी कटावणीने व लोखंडी पकडीने आरोपी जलालउद्दीन चौधरी (४०) व राजकुमार गौड (३२) यांनी आत प्रवेश केला असता याची माहिती फिरोज चाँद व त्याच्या सहकाऱ्यांना मिळाल्याने त्यांनी तातडीने तळोजा पोलिसांशी संपर्क साधून त्या दोघांना पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. त्यांच्या अटकेमुळे इतर जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## सचिन तांडेल मेमोरियल फाऊंडेशन कळंबुसरे मार्फत शैक्षणिक साहित्य वाटप

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण विभागातील विविध गावातील उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२२ साठी बसलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप रा. जि. प. प्राथमिक शाळा कळंबुसरे येथे करण्यात आले. सदर आयोजित कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती कळंबुसरे, सर्व शिक्षक,पालक वर्ग आणि विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते. शालेय साहित्याचे वाटप संजय केणी तसेच गरूड झेप मंडळ विंधणे (अध्यक्ष –प्रमोद नवाळे) यांच्याकडून शैक्षणिक साहित्याकरिता कार्यक्रमात धनादेश सुपूर्त करण्यात आला. यावेळी कळंबुसरे शाळेतील हर्षाली नाईक जिल्ह्यात २३ वी तसेच जिया पाटील जिल्ह्यात १४५ वी आल्याने या विद्यार्थिनीचे विशेष अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता करताना उरण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विविध विद्यार्थ्यांचे , शाळेच्या मुख्याध्यापकांचे, वर्ग शिक्षकांचे व इतर शिक्षकांचे तसेच पालकांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# पेण तालुक्यात १५ ते १८ वयोगटातील मुलांच्या लसीकरणा सुरुवात ; तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । पेण**


देशासह राज्यात कोरोना बरोबर ओमायक्रॉनचे रुग्ण वाढत असल्याने केंद्र सरकारने देशातील १५ ते १८ वयोगटातील तरुणांचे लसीकरण ३ जानेवारी पासून सुरू करण्यात येईल असे आदेश दिल्यानंतर आज पासून महाराष्ट्रात सर्वच ठिकाणी तरुणाईच्या लसीकरणाला सुरुवात करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने आज सकाळपासून पेण शहरासह तालुक्यातही मुलांच्या लसीकरणाचा शुभारंभ उप जिल्हा रुग्णालयात करण्यात आला या लसीकरणाला तरुणाईने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.

पेण उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय उपअधीक्षक डॉ.राजिव तांबाळे, नगरपालिकेचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.सौरभ सूर्यवंशी, डॉ.नेत्रा पाटील, असिस्टंट मेट्रोन मीरा काळे, प्रवेशिका शुभांगी म्हात्रे, गीता भरुड, अस्मिता भगत, समुपदेश अमोल नारखेडे, पालिका प्रशासन अधिकारी राजाराम नरुटे आदिंनी याबाबत मेहनत घेऊन तरुणांना प्रोत्साहित करीत आहेत. सदर मुलांना कोव्हॅक्शिन लसीचे डोस देण्यात येत असून २८ दिवसानंतर दुसरा डोस घेता येणार आहे. या लसीकरणला सुरुवात होताच मुला मुलींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.

# 300 मॉडेल्समधून मराठमोळी राधिका अशोक राणे ठरली मिस ठाणे २०२१

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राजधानी जयपूर येथील टोक रोड येथील हॉटेल मैरियटमध्ये चार दिवसिय ब्यूटी पेजेंट, फॅशन वीक अवॉर्ड शो फॉरएवर मिस एन्ड मिसेज इंडिया २०२१ चे आयोजन करण्यात आले होते. यास्पर्धेत राधिका अशोक राणे हिने मिस ठाणे २०२१ (सिटी विनर) हा खिताब पटकावला.



या स्पर्धेत मराठमोळ्या राधिका राणे हिने डिजायनर ड्रेसमध्ये रँपवॉक करून सर्वांच्या नजरा आपल्याकडे खिळवून ठेवल्या. फॉरएवर मिस एन्ड मिसेज इंडिया २०२१ या स्पर्धेसाठी वेगवेगळ्या शहरांतून आलेल्या सिटी विनर्सची क्राऊनिंग सेनेमनी करण्यात आली. यावेळी या स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी देशाच्या विविध राज्यांतून आलेल्या विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. यांच्या मतानुसार फॉरएवर रियल सुपर हीरोज व रियल सुपर वुमेल अवॉर्ड सेरेमनीच्या शेवटच्या दिवशी फॉरएवर स्टार इंडियाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ७० पेक्षा जास्त गटांतून २५० स्पर्धकांना सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी बिजनेसमैन, 'एंटरपरेन्योर, स्पोर्टस, एजुकेशन, मेडिकल, फैशन, ब्यूटी, वेलनेस, आर्ट, कल्चर, सोशल वर्क, लिटरेचर यासारख्या ७०हून अधिक गटांतून २५० स्पर्धकांना प्रशस्तिपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले, अशी माहिती या स्पर्धेचे आयोजक राजेश अग्रलवाल यांनी दिली.

# नैना प्रकल्प बाधित शेतकरी उत्कर्ष समितीतर्फे एक दिवसीय लाक्षणिक उपोषण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नैना प्रकल्प बाधित शेतकरी उत्कर्ष समिती पनवेल यांच्यातर्फे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, पनवेल येथे एक दिवसीय लाक्षणिक उपोषण ४ जानेवारी रोजी सकाळी दहा ते सहा वाजेपर्यंत करण्यात येणार आहे.

पनवेल तालुक्यात होत असलेल्या नैनाला शेतकऱ्यांचा प्रचंड विरोध आहे. हा प्रकल्प रद्द होण्यासाठी शेतकऱ्यांतर्फ़े एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले जातणार आहे. या लाक्षणिक उपोषण द्वारे शेतकरी नैनाला असलेला विरोध दाखवणार आहेत. सरकारने हा प्रकल्प जबरदस्तीने लादल्यास शेतकरी आत्मदहन करणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या लाक्षणिक उपोषणला शेतकरी बांधव व इतरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

# जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गांवर कारची पुल कठड्याला धडक

**दै.रायगड नगरी । खोपोली**

जुन्या मुंबई – पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वर अपघाताची मालिका सुरूच असून रविवार दि. २ जानेवारी २०२२ रोजी रात्री ८ ते ८.३० वाजेच्या सुमारास मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या एका मारुती सेलेरो कार क्रमांक (एमएच –०२–एफई २४०३) ने हाजी अब्दुल लतीफशहा बाबा दर्गांच्या हद्दीतील पुलाच्या कठड्याला जोरदार धडक दिल्याने अपघात झाला.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार कार एक महिला चालवित होती. सदर महिला एकट्याने मुंबईकडून पुण्याकडे प्रवास करीत होती. सुदैवाने या अपघातात जिवितहानी झाली नसून जखमी अवस्थेतील कार चालक महिलेला खालापूर रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. कार चालक महिलेला कोणतीही गंभीर दुःखापत झालेली नाही, मात्र कार चक्काचूर झाला आहे. अपघातानंतर कार पुलाच्या कठड्या जवळून हटवितांना काही काळ वाहतूक थांबविण्यात आली होती.

मुंबईहून पुण्याकडे जाणारा रस्ता व हाजी अब्दुल लतीफशहा बाबा दर्गांच्या हद्दीतील पुलात गॅप आहे. त्याचप्रमाणे मुंबई – पुणे राष्ट्रीय महामार्गावर, पुलाच्या परिसरात सुरक्षेच्या हेतूने कोणतेही सूचना फलक नाहीत. पुलालगत लोखंडी बेरीगेड तसेच रिफ्लेक्टर नसल्याने वाहनचालकांना प्रवासादरम्यान अंदाज मिळत नसल्याने अपघात होत असल्याचे वाहनचालकांकडून सांगण्यात आले. सदर महिलेचे नशीब बलवत्तर असल्याने कठड्याला धडक दिल्यानंतर कार नाल्यात कोसळली नाही, अन्यथा मोठा अनर्थ घडला असता, असे उपस्थितांनी सांगितले.

काही महिन्यांपूर्वीच या मार्गाचे काम करण्यात आले असल्याचे समजते. पण पुल व रस्त्यांवरील सुरक्षा साधनांचा अभाव पाहता एमएसआरडीसीचे अधिकारी या मार्गांवर नेमके कोणते काम पाहतात? असा प्रश्न निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वीच खोपोली येथे पुलाजवळ असाच अपघात झाला होता, ज्यात एका तरूणाला जीव गमावावा लागला होता. तशाच प्रकारची घटना घडल्यानंतर किंवा जीवितहानी झाल्यावर लक्ष देणार का? असा संतप्त सवाल प्रवासी वाहन चालकांमधून विचारला जात आहे.


मा.गोडसे मॅडम

अॅड.सुजाता पाटील

**जाहीर समन्स**

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज १९२१/२०२१

ने.ता.१४/२/२०२२

श्री.सुनील पुंडलिक जाधव व एक — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार १ यांचे पती व अर्जदार नं.२ यांची आई व मयत कै.श्रीमती.विजया सुनील जाधव यांचे दि.२३/३/२०२० रोजी खारघर येथे निधन झाले. कै.श्रीमती.विजया सुनील जाधव यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मालमत्ता परिशिष्ट**

**सदनिका नं.एच ९/६, २१, इमारतीचे नाव पारिजात सहकारी गृहनिर्माण संस्था नियोजित, ब्लॉक नं. स्पॅगेटी, सेक्टर १५, खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२१०**

**क्षेत्रफळ : ४७.९६ चौ.मी. व ५१६.०५० चौ.फूट**

**अॅग्रीमेंट मालमत्ता मुल्यांकन : २५,००,०००/–**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रांसहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०३/०१/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गोडसे मॅडम

अॅड.प्रमिला ठाकूर / पाटील

**जाहीर समन्स**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सा़ो. यांचे कोर्टात

एम.ए.नं.१९८१/२०२१

नि.नं.७/ड

ने.ता.१७/२/२०२२

१) मनिबाई सोमा ढेबे

लग्नानंतर अधिचे नांव मनिबाई गंगा बावधाने उर्फ धनगर

रा.सारसई, आपटा, पनवेल, जि.रायगड

२) भागीबाई गंगा बावधाने उर्फ धनगर

लग्नानंतर नांव भागाबाई कानु घाटे–मयत

१/१) कोंडू कानु घाटे

वय : ७० वर्षे, धंदा : शेती

१/२) धोंडू कानु घाटे

वय : ६७ वर्षे, धंदा : शेती

दोघे १/१ व १/२ रा.खडई, ता.खालापूर, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार मनिबाई गंगा बावधाने उर्फ धनगर लग्नानंतरचे नांव मनिबाई सोमा ढेबे रा.सारसई आपटा, पनवेल, जि.रायगड येथील रहिवाशी असून त्यांचे वडील कै.गंगा जानू बावधाने उर्फ धनगर हे दि.४/६/१९३६ रोजी तर आई कै. साईबाई गंगा बावधाने उर्फ धनगर या दि.२४/०४/१९४५ रोजी मौजे येथे त्यांच्या राहत्या घरी अल्पशा आजाराने मयत झाले आहेत. तसेच त्यांची मुलगी कै.भागीबाई कानु घाटे या देखील दि.१४/०८/२००५ रोजी मौजे : खडई, खालापूर येथे मयत झाले असून त्यांना अर्जदार कोंडू कानु घाटे व धोंडू कानु घाटे हे भाचे आहेत. अर्जदार यांनी मयत कै.गंगा जानु बावधाने उर्फ धनगर व कै.साईबाई गंगा बावधाने उर्फ धनगर यांचे कायदेशीर वारस आहेत. यासाठी सदरील अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे. त्यांच्या नांवे मौजे : घेरकिल्ला माणिकगड, स्थानिक नांव : खैरपाटी ग.क्र.३०, क्षेत्र १६.३९.००, पो.ख. १.८६.००, एकूण १८.२५.००, आकारणी ३८.०० होती ती सरकारी दप्तरी जमा झालेली आहे. तिला वारसांची नोंद होण्यासाठी तसेच सदरील मिळकती संदर्भात तहसील पनवेल, उपविभागीय अधिकारी पनवेल येथे कामकाज चालविण्यासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी मयत कै.गंगा जानु बावधाने उर्फ धनगर हे दि.४/६/१९३६ रोजी तर आई कै.साईबाई गंगा बावधाने उर्फ धनगर ही दि.२४/०४/१९४५ रोजी यांच्या मृत्यूनंतर कायदेशीर वारस आहेत. याकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केलेले आहे. तरी सदरील वारसा संदर्भात कोणाचीही कसलीही हरकत असल्यास १५ दिवसात मे.पनवेल कोर्टात येवून कळवावे. तसे नाही कळवले तर मागून येणाऱ्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही.

सदरील अर्जाची पेपर नोटीस ३ माहे जानेवारी सन २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यास दिली आहे.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**तहसीलदार पनवेल यांचे न्यायालयात**

क्र.कुळ कायदा कलम ७० ब केस क्र.९/२०२०

प्रति,

१) श्री.कान्हा बामा सिनारे

रा.दुंदरे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.मणिलाल रेवाशंकर भट

२) श्री.नटवरलाल रेवाशंकर भट

३) श्री.बळवंतलाल रेवाशंकर भट

४) श्री.प्रभाकर रेवाशंकर भट

५) श्री.चिनुबाई रेवाशंकर भट

सर्व रा.दुंदरे, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

सामनेवाले यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त नमूद केलेल्या प्रश्नाधीन मिळकतीबाबत अर्जदार यांनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७० ब अन्वये कुळ निश्चित करून मिळणेकामी दिनांक ३०/०९/२०२० रोजी दावा दाखल केलेला आहे. त्या अनुषंगाने दिनांक १९/०३/२०२१ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. तदनंतर प्रस्तुत दाव्यामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र प्रस्तुत प्रकरणातील सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. यास्तव सदर दाव्याची पुढील सुनावणी निम्न स्वाक्षरीतांच्या समोर दिनांक १४/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय पनवेल यांचे कार्यालय, साईनगर, तलाठी प्रशिक्षण केंद्र, पनवेल, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब, या जाहीर नोटीसीद्वारे अर्जदार व सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकतीशी हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी दिनांक १४/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत प्राप्त झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**दावा जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे दुंदरे, ता.पनवेल | १६/२ | ०.२४.० | २.०० |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण : पनवेल

दिनांक : २७/१२/२०२१

**सही/– तहसीलदार पनवेल**

राव साहेब

अर्जदारतर्फे वकील

अॅड.प्रितम शा. वासकर

**जाहीर समन्स**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज १४५२/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.०२/२/२०२२

कै.लक्ष्मण काथोर पाटील (मयत) तर्फे वारस

१) श्रीमती.उर्मिला लक्ष्मण पाटील

वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी

२) श्री.किशोर लक्ष्मण पाटील

वय : ४४ वर्षे, धंदा : शेती

३) श्री.नरेश लक्ष्मण पाटील

वय : ४१ वर्षे, धंदा : शेती

४) श्री.शिवाजी लक्ष्मण पाटल

वय : ३२ वर्षे, धंदा : शेती

वरील सर्व रा.भंगारपाडा, ता.पनवेल, जि.रायगड

५) नंदा लक्ष्मण पाटील (पुर्वाश्रमीची)

सौ.नंदा सुरेश मुंडे

वय : ३६ वर्षे, धंदा : शेती

रा.गावदेवी पाडा, मुंडे चाळ, व्ही.के.हायस्कूल जवळ,

पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै. लक्ष्मण काथोर पाटील हे दि.५/१०/२०२० रोजी मौजे : भंगारपाडा, ता.पनवेल येथे मयत झालेले असून श्रीमती.उर्मिला लक्ष्मण पाटील... वगैरे हे त्यांचे खाली वर्णन केलेल्या मिळकतीस कायदेशीर वारसदार आहेत.

कै.लक्ष्मण काथोर पाटील ह्यांचे हिश्श्यास आलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन

**मौजे : मानघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| मानघर | ५५ | – | ०–२८–१० पो.ख. ०–०३–८० | ५.७५ |

श्रीमती.उर्मिला लक्ष्मण पाटील... वगैरे हे कै.लक्ष्मण काथोर पाटील यांचे कायदेशीर वारसदार आहेत. ह्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी. मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलामार्फत हजर होवून हरकती घ्याव्यात. जर ह्या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती न आल्यास हे मे.कोर्ट श्रीमती.उर्मिला लक्ष्मण पाटील... वगैरे ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करेल व ते जर कै.लक्ष्मण काथोर पाटील यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०३/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.राव साहेब ह्यांचे न्यायालयात

वारसांचे सर्टीफिकेट बद्दल जाहीरनामा — दिवाणी अं.१५० रा

Civ. A 150 m

अॅड.सुनिता प्रभू

अॅड.दर्पण पाटील

प्रोसेस जमा रु.५०/– — अर्जदार यांचे वकील

**जाहीर समन्स**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय (व.स्तर) यांचे न्यायालयात पनवेल

दि.चौ.अर्ज १९६३/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.१६/२/२०२२

१) श्री.मच्छिंद्र तुकाराम भोईर

वय : ६० वर्षे, व्यवसाय : नोकरी

रा.मु.पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड

२) श्री.दिलीप तुकाराम भोईर

वय : ५२ वर्षे, व्यवसाय : नोकरी

रा.मु.पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड

३) श्रीमती.वत्सला चंद्रकांत पाटील

वय : ४३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी

रा.मु.पतनोली, पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड

४) श्रीमती.सरिता पांडुरंग पाटील

वय : ४० वर्षे, व्यवसाय : गृहिणी

रा.मु.सांडगे, पो.आजिवली, हनुमान मंदिर जवळ,

ता.पनवेल, जि.रायगड

५) श्रीमती.अनिता राजू सुर्यवंशी

वय : ३८ वर्षे, व्यवसाय : नोकरी

रा.मु.पो.चिरनेर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार यांचे वडील कै.तुकाराम गोमा भोईर यांचे दि.१३/११/२०२१ रोजी कुंडेवहाळ येथे निधन झाले. मयत कै.तुकाराम गोमा भोईर यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**परिशिष्ट अ**

| क्रं. | गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १) | कुंडेवहाळ | ७९ | ३ | ०–०३–८० |
| २) | कुंडेवहाळ | ४७ | १ | ०–४४–९० |

**परिशिष्ट ब**

| क्रं. | गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १) | कुंडेवहाळ | ९ | १ | ०–१८–० |
| पैकी कै.तुकाराम गोमा भोईर यांचे हिश्श्याचे मिळकतीबाबत | | | | |

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०३/०१/२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

योगेश ना. म्हात्रे

**जाहीर समन्स**

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे कोर्टात

रे.मु.नं.५६/२०१५

नि.नं.५२/ड

ने.ता.०५/१/२०२२

१) श्रीमती.यमुनाबाई शंकर पाटील

उर्फ कल्पना केशव पाटील

वय : ५० वर्षे, धंदा : शेती व गृहिणी

रा.साई, ता.पनवेल, जि.रायगड

२) श्रीमती.मिनाक्षी बाळकृष्ण पाटील

उर्फ कल्पना केशव पाटील

वय : ४५ वर्षे, धंदा : शेती व गृहिणी

रा.कळंबुसरे, ता.उरण, जि.रायगड — वादी

विरुद्ध

१) श्रीमती.जनाबाई पांडुरंग म्हात्रे

वय : सज्ञान, धंदा : गृहिणी

रा.विंधणे, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड

२) सौ.सुशिला जयराम पाटील

वय : ७५ वर्षे, धंदा : गृहिणी

रा.रायगड गल्ली, अॅड अलमेडा रोड, ठाणे (पश्चिम)

३) सौ.पुष्पा पुरुषोत्तम ठाकूर

वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी

रा.खालची पाखडी, ठाकूर, निवास,

कांजूरमार्ग (पूर्व), मुंबई

४) सौ.निता दिलीप देवरुखकर

वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी

रा.चंदनवाडी, नुरीबाबा दर्गा रोड,

जामकर चाळ, ठाणे (पश्चिम)

५) श्री.लक्ष्मण पांडुरंग म्हात्रे

वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी

रा.पाटीलवाडी, नुरीबाबा दर्गा रोड,

भागुमावशीची चाळ, ठाणे (पश्चिम)

६) श्रीमती.भिमाबाई काना पाटील

वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी

७) श्री.राकेश काना पाटील

वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी

८) श्री.योगेश काना पाटील

वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी

वरील प्रतिवादी क्र.६ ते ८ सर्व

रा.मोठे भोम, ता.उरण, जि.रायगड

९) श्री.विजय शंकर पाटील

वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी

रा.भोम, ता.उरण, जि.रायगड — प्रतिवादी

वादी श्रीमती.यमुनाबाई शंकर पाटील उर्फ कल्पना केशव पाटील व इतर यांनी प्रतिवादी श्रीमती.जनाबाई पांडुरंग म्हात्रे व इतर यांच्या विरुद्ध दावा हक्कप्रस्थापनेकरिता व निरंतर मनाई हुकूमाकरिता उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात दिवाणी दावा रे.मु.नं.५६/२०१५ दाखल केला आहे. सदर दाव्याकामी मे.कोर्टाच्या आदेशानुसार तुम्हास बेलिफामार्फत दाव्याकामी हजर राहण्यासाठी प्रतिवादी क्र.२ सौ.सुशिला जयराम पाटील यांना सदर दाव्यातील तुमच्या पत्यावर दोन वेळा समन्स व नोटीसेस पाठविण्यात आली आहे. परंतु सदर जागेवर सध्या तुम्ही राहत नाही व आता कुठे राहत आहेत हे माहित नाही तसेच सदर ठाणे (पश्चिम) भरपूर मोठा असून तेथे ठिकठिकाणी शोध घेतला असता व विचारले असता प्रतिवादी नावाची व्यक्ती कोठे राहतात हे तेथील लोकांना माहित नाही, असे बेलिफ रिपोर्ट वरुन दिसत आहे.

तरी तुम्हांस कळविण्यात येत आहे की, तुम्हांस सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२ सौ.सुशिला जयराम पाटील म्हणून तुम्हाला पक्षकार करण्यात आले आहे. सदर दाव्याविरुद्ध तुम्हाला तुमचे म्हणणे व कैफियत दाखल करण्याकरिता दि.०५/०१/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे, सदर दाव्याकामी हजर होवून दाव्याची सुनावणी पुढे सुरू होण्यासाठी या वादीस मदत करावी. तुम्ही तसे न केल्यास तुमच्या विरुद्ध पुढील आादेश होवून मिळणेकरिता वादीतर्फे मे.कोर्टात अर्ज करून तुमच्या विरुद्ध पुढील कार्यवाही करण्यात येईल हे कळावे.

आज दि.२८/१२/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले.

**सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण**

